परिपत्रक

क्रमांक कॉन/एलआर ३४/क-१/८८
पुणे, दिनांक :- १६/५/१९८८

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना

लक्षसाध्य करताना टप्पेवार साध्यता करणेबद्दल.

जमीन एकत्रीकरण योजनेचे वार्षिक लक्ष साध्य करतांना टप्पेवार लक्ष साध्य न केलेस संबंधित सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे गोपनीयं अहवालांत नोंद घ्यावी याबाबत इकडील परिपत्रक क्र. सम उि. ९. ३. ८३ मधील परिच्छेद ७ मध्ये सुचना दिलेल्या आहेत. यासुचनांची अंमल बजावणी करतांना असा मुधा उपस्थित झाला आहे कि, सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांसी विहित केलेले लक्ष साध्य केले आहे. परंतु टप्पेवार लक्ष साध्य केलेले नाही ही दोन्ही विधाने परस्पर विरोधी वाटत असलेने गोपनीय अहवालांत अशी नोंद घेणे बरोबर/संयुक्तिक वाटत नाही. त्याचप्रमाणे वार्षिक लक्ष साध्य न झालेस अगर कमी गटबांधणी केली/झाली असलेस संबंधित स. ए. अ. यांचेविरुध्द कारवाई करावी अशाही सुचना वेगळया परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. वरील प्रश्न हे याकार्यालयाचे विचाराधीन होते आणि त्याबद्दल खालील प्रमाणे फेरसुचना देणेत येत आहेत.

[१] यापुढे स. ए. अ. यांनी वर्षाचे विहित हिशाचे लक्ष साध्य केले आहे अगर कसे याचीच नोंद फक्त त्यांचे गोपनीय अहवालांत ठेवणेची आहे ज्या स. ए. अ. यांनी असे विहित लक्ष साध्य केलेले नाही अशांचे बाबतीत म. ना. से. नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन उप. सं. भू. अ. यांनी कारवाई करावी.

[२] स. ए. अ. यांचे टप्पेवार लक्ष साध्यते बाबत कोणतीही नोंद गोपनीय अहवालांत ठेवू नये. तथापि कामाची गुणवत्ता वाढविणेचे दृष्टीने टप्पेवार लक्ष साध्य करणेबाबत सुचना दिलेल्या असलेने, जे स. ए. अ. असे लक्ष साध्य करणार नाहीत त्यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करणेंत यावी.

[३] जर स. ए. अ. यांनी एकाद्या वर्षात कमी गटबांधणी काम केले असल्यास त्यांचेविरुध्द वरीलप्रमाणे शिस्तभंग कारवाई करणेची आहे.

[४] एखाद्या स. ए. अ. यांचे विरुध्द लक्ष साध्य न करणे/कमी गटबांधण काम करणे/टप्पेवार लक्ष साध्य न करणे बाबत शिस्तभंग कारवाई करणेची असल्यास ती एकाचवेळी एकाच आरोपपत्राकानुसार केली जाईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

२/- शिस्तभंग कारवाईचा अंतिम निर्णय होण्यास फारच विलंब होते असे इकडे निदर्शनास आलेले आहे. तरी शिस्तभंग कारवाई सुरुं केल्या पासुन त्याचा अंतिम निर्णय ३ महिन्यांत होईल याची दक्षता घ्यावी.

३/- इकडील पत्र क्र. निवि. ८७/क-१/८६ दि. ७-५-८६ अन्वये सुधारित वार्षिक कार्यक्रम फेब्रुवारी अखेर सादर करणेबाबत सुचना देणेत आलेल्या आहेत.

----------२/--------

तथापि याची अंमलबजावणी केली जात नाही असे आमचे निदर्शनास आलेले आहे. वर्ष संपलेनंतर वार्षीक सभेचेवेळी/निरीक्षण ज्ञापाचेवेळी रिक्त पदे विचारांत घेवून एकत्रीकरण अधिकारी/उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडून विहित लक्षांत सुधारणा केली जाते व हे सुधारित लक्ष गृहित धरुन घ्यावे अशी या कार्यालयास गळ घालण्यांत येते ही बाब खरोखरच समाधानकारक नाही. तसे यापुढे सुधारित वार्षिक कार्यक्रम वेळीच मंजूर केले जातील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

वरील सुचनांचे एकत्रीकरण अधिकारी/उपसंचालक भूमि अभिलेख यांनी कटाक्षाने पालनकरावे.

सही/- [अ. ना. बटब्याल]<br>
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,<br>
भूमि अभिलेख [म. रा. ] पुणे.

प्रतिलिपी /- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] /एकत्रीकरण अधिकारी [सर्व] सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी [सर्व] यांना माहितीसाठी रवाना.

प्रत :- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे कार्यालयांतील का. अ. [सर्व] व अभिलेखापाल/सहाय्यक जमाबंदी आयुक्त [सर्व] यांना माहितीसाठी.

// नि र्ग मि त //

सहाय्यक जमाबंदी आयुक्त [एकत्रीकरण]<br>
पुणे.

20 MAY 1988

मोरे १५५/-

----------